# मे. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई

सीएसए ७६७/२०१७
कंपनी कायदा, २०१३ खालील केसमध्ये (१८/२०१३)
कंपनी कायदा, २०१३ चे कलम २३० ते २३२ चे प्रकरणाबाबत
आणि
एकत्रिकरणाच्या योजनेबाबतच्या प्रकरणात
दरम्यान
**बालाजी अमाईन्स लि. (ट्रान्सफरी कंपनी)**
आणि
**भाग्यनगर केमिकल्स लिमिटेड (प्रथम ट्रान्सफरर कंपनी)**
आणि
**बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस् लिमिटेड (द्वितीय ट्रान्सफरर कंपनी)**
यांच्या एकत्रिकरण करण्याच्या योजनेच्या केसमध्ये
आणि

त्यांचे माननीय शेअरधारक आणि धनको
बालाजी अमाईन्स लिमिटेड, ही कंपनी कायदा, १९५६ च्या तरतुदीप्रमाणे बनविलेली कंपनी असून तिचा CIN नंबर L24132MH1988PLCO49387आणि तिचे नोंदणीकृत ऑफीस बालाजी टॉवर्स, नं. ९/१अ/१, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर महाराष्ट्र-४१३२२४, भारत, तिचे प्रतिनिधीत्व पूर्णवेळ संचालक श्री. गड्डम हेमंथ रेड्डी, email : ghr@balajiamines.com, Ph. : 0217-2310824
...... अर्जदार/ट्रान्सफरी कंपनी

नोटीस आणि बालाजी अमाईन्स लि.चे शेअरधारकांचे सभेची नोटीस/ट्रान्सफरी कंपनी.

आपल्याला अशी सूचना देण्यात येत आहे की, दिनांक २३ ऑगस्ट २०१७ च्या आदेशाने मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई पीठाने बालाजी अमाईन्स लिमिटेडचे साधारण भागधारकांची सभा बालाजी अमाईन्स लि. आणि भाग्यनगर केमिकल्स लि. (प्रथम ट्रान्सफरर कंपनी) आणि बालाजी ग्रीनटेक प्रॉडक्टस लि. (द्वितीय ट्रान्सफरर कंपनी) यांचे एकत्रिकरण करण्याच्या योजनेबाबत विचार विनिमय करण्यासाठी आणि जर योग्य वाटल्यास जशीच्या तशी किंवा जरूर त्या दुरुस्त्यासह एकत्रिकरण योजना मंजूर करणेसाठी बोलावण्याचा निर्देश दिला.

सदरचे आदेशास अनुसरून आणि त्यामध्ये आणखी दिलेल्या निर्देशानुसार याबाबत आणखी सूचना देण्यात येते की, बालाजी अमाईन्सच्या साधारण भागधारकांची सभा ही दिनांक २५ ऑक्टोबर २०१७ रोजी ३.३० वाजता कंपनीचे नोंदणीकृत ऑफीसमध्ये म्हणजे बालाजी टॉवर्स, नं. ९/१अ/१, होटगी रोड, आसरा चौक, सोलापूर महाराष्ट्र-४१३२२४, भारत येथे होईल. त्यामुळे कंपनीचे साधारण भागधारकांनी सदरवेळी आणि सदर जागी हजर रहावे आणि मतदान करावे.

सदर योजनेच्या प्रती आणि कलम २३० खालील अकौंट स्टेटमेंट कंपनीच्या नोंदणीकृत ऑफीसमधून किंवा त्यांचे वकील श्री. वाय. सूर्यनारायण यांचे ऑफीसमधून म्हणजे फ्लॅट नं. १०६, पहिला मजला, निर्मल टॉवर्स, २००, साईबाबा मंदिराजवळ, द्वारकापुरी कॉलनी, पंजागुट्टा, हैद्राबाद-५०००८२ मोफत मिळतील. ज्या व्यक्ती बालाजी अमाईन्स लिमिटेडच्या साधारण भागधारकांच्या सभेला हजर राहण्यास व मतदान करण्यास पात्र असतील ते व्यक्तीशः किंवा प्रतिनिधीमार्फत मतदान करू शकतील. जर त्यासाठीचा जरूर तो फॉर्म कंपनीच्या नोंदणीकृत ऑफिसात म्हणजे बालाजी टॉवर्स, नं. ९/१अ/१, होटगी रस्ता, आसरा चौक, सोलापूर महाराष्ट्र-४१३२२४, भारत सभेच्या ४८ तास अगोदर जमा केलेला असल्यास.

प्रतिनिधीत्वासाठीचा फॉर्मदेखील कंपनीचे नोंदणीकृत ऑफीसमध्ये उपलब्ध असेल. मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरण, मुंबई पीठाने श्री. गड्डम हेमंथ रेड्डी, संचालक आणि कंपनीचे अधिकारीक प्रतिनिधी यांची नेमणूक, त्यांचे गैरहजेरीत डी. राम रेड्डी, संचालक आणि कंपनीचे अधिकृत प्रतिनिधी चेअरमन आणि श्री. लोकेश अग्रवाल, कंपनी सेक्रेटरी यांची सदर सभेचे निरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे. जर वर नमूद केलेली एकत्रिकरणाची योजनेस सभेने मंजूर केल्यास तर ती मा. राष्ट्रीय कंपनी कायदा न्यायाधिकरणाचे मंजुरीचा विषय होईल.

सही/-
**गड्डम हेमंथ रेड्डी,**
सभापती, साधारण
भागधारकांचे न्यायाधिकरणाने
बोलावलेल्या सभेचे,
बालाजी अमाईन्स लि.

DIN : 00003868

अशी आणखी सूचना देणेत येते की, सेबीचे (सूचीतील दायित्व आणि प्रगटीकरण आवश्यकता) विनिमय, २०१५ चे नियम ४४ चे पूर्ततेसाठी आणि कंपनी कायदा, २०१३ चे कलम १०८ हे कंपनी (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे कलम २० आजपावेतोचे दुरुस्तीसोबत वाचले असता अर्जदार कंपनीने असे नमूद केले आहे की, अर्जदार कंपनी ही रिमोट ई-व्होटिंग सुविधा तिचे सभासदांना इलेक्ट्रॉनिकली मतदान करणेसाठी सर्व्हरची सुविधा नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("NSDL") मार्फत केली आहे.

तसेच आणखी सूचना देण्यात येते की, न्यायाधिकरणाने बोलावलेली सभा ही याची दर्शक आहे की, इलेक्ट्रॉनिक मतदानाची प्रक्रिया व पद्धत या सोबत कलम १०२ खालील स्टेटमेंट जे कंपनी कायदा, २०१३ चे कलम २३० सोबत वाचावयाचे आहे, एकत्रिकरणाची योजना, मूल्यनिर्धारण, योग्य व निष्पक्ष मत, तक्रारी, बीएसई लिमिटेड व नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया लिमिटेडकडून आलेली मतप्रदर्शित करणारी पत्रे, कंपनीच्या संचालक मंडळाने मान्य केलेला अहवाल, योजनेचा महत्त्वाच्या अशा मॅनेजरीयल पोस्ट वरील व्यक्तींवर कंपनीचे प्रमोटर्स व नॉन प्रमोटर्स भागधारकांवर होणारा परिणाम, प्रॉक्सीचा फॉर्म आणि हजेरी स्लीप कंपनीच्या वेबसाईटवर उपलब्ध असल्याबाबत www.balajiamines.com आणि नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडचे वेबसाईटवर म्हणजे www.evoting.nsdl.com वर उपलब्ध असल्याबाबत.

सर्व भागधारकांना असे कळविण्यात येते की,

१. न्यायाधिकरणाने बोलाविलेल्या सभेच्या नोटीसीत नमूद केलेले विशिष्ट काम हे इलेक्ट्रॉनिक मतदानाने होण्याची शक्यता आहे.
२. दुरून इलेक्ट्रॉनिकली मतदान २२ ऑक्टोबर २०१७ रोजी सकाळी ९.०० वाजता सुरू होईल आणि २४ ऑक्टोबर २०१७ रोजी संध्याकाळी ५ वाजता संपेल.
३. भागधारकाची इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्याबाबत पात्रता नक्की करण्याचा शेवटचा दिवस हा बुधवार १८ ऑक्टोबर २०१७ असेल.
४. कोणीही व्यक्ती, ज्याने शेअर्स घेतलेले असतील आणि न्यायाधिकरणाने बोलाविलेल्या सभेची नोटीस पाठविल्यानंतर भागधारक झाला असेल आणि कट ऑफ तारखेच्या दिवशी शेअरधारक असेल म्हणजे १८ ऑक्टोबर २०१७ रोजी शेअरधारक असेल तर तो लॉगइन आयडी आणि पासवर्ड e-request evoting.nsdl.com वर पाठवून मिळवू शकतो.
५. सभासदांनी याची नोंद घ्यावी की,
   अ) रिमोट ई-व्होटिंग मोड्यूल हे नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेडकडून २४ ऑक्टोबर २०१७ रोजी संध्याकाळी ५.०० वाजल्यानंतर डिसएबल केले जाईल आणि रिमोट ई-व्होटिंग या वेळेनंतर मान्य केले जाणार नाही.
   ब) बॅलट पेपरद्वारा मतदान करण्याची सवलत (पोल) ही न्यायाधिकरणाने बोलाविलेल्या सभेच्या जागी दिली जाईल. ज्या सभासदांनी मतदान remote e-voting द्वारे मतदान केलेले नसेल. त्यांच्यासाठी फक्त.
   क) सभासद ज्यांनी त्यांचे मत सभेच्या अगोदर remote e-voting ने केलेले असेल ते देखील सभेस हजेरी लावू शकतील, परंतु त्यांना पुन्हा न्यायाधिकरणाने बोलाविलेल्या सभेत मतदान करण्याचा हक्क राहणार नाही.
   ड) एखादा व्यक्ती ज्याचे नांव सभासद रजिस्टरमध्ये नोंदलेले असेल किंवा बेनिफिशिअल ओनर्सचे रजिस्टर डिपॉझिटरीजने मेनटेन केलेल्या रजिस्टरमध्ये कट ऑफ तारखेदिवशी म्हणजे १८ ऑक्टोबर २०१७ रोजी असेल तेच फक्त रिमोट ई-व्होटिंगची सवलत किंवा सभेच्या जागेतील पोलमध्ये भाग घेऊ शकतील.

जर कोणाही सभासदास ई-व्होटिंगसंदर्भात कोणतेही प्रश्न असतील तर ते त्या संदर्भात श्री. जी. हेमंथ रेड्डी, कंपनी संचालक यांचेशी कंपनीच्या नोंदणीकृत ऑफिसात संपर्क साधू शकतील किंवा त्यांना त्यांचे प्रश्नाबाबत मेल पाठवून cs@balajiamines.com किंवा त्यांना 040-27898206 या नंबरवर कॉल करू शकतील.

सही/-
**गड्डम हेमंथ रेड्डी,**
सभापती, साधारण भागधारकांचे
न्यायाधिकरणाने बोलावलेल्या सभेचे,
बालाजी अमाईन्स लि.,
DIN : 00003868